
11 MAY 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# कोरोनाला रोखणार रोबोट...

## निर्जंतुकीकरण, रुग्णांची देखभाल करणार : प्रा. सोनकवडे यांचे संशोधन

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

कोरोनाविरुद्धच्या लढाईत निर्जंतुकीकरणासह रुग्णांची देखभाल यास खूप महत्त्व आहे. हे काम एखाद्या रोबोटकडून करून घेता आलं तर...? हीच कल्पना घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागातील प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी 'तारा' नावाचा रोबोट डिझाईन केला आहे. या रोबोटमुळे कोरोना विषाणूसह सूक्ष्म जीवांचे निर्जंतुकीकरण करणे सहज साध्य होईल, असा दावा त्यांनी केला आहे.

कोरोना विषाणूचा संसर्ग कमी करण्यासाठी सध्या युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. हॉस्पिटल, आयसोलेशन वॉर्डस् व खोल्यांबरोबर वावर असणाऱ्या जागांचे निर्जंतुकीकरण करणे जिकिरीचे बनले आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन प्रा. सोनकवडे यांनी कोरोनाचा प्रसार रोखण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकेल, असा रोबोट काही दिवसांपूर्वी तयार केला आहे. तारा रोबोट नावाने परिचित असणाऱ्या रोबोटला यू. व्ही. ३६० सॅनिटायझर मॉड्युल' असे नाव दिले आहे. यात काही गोष्टी नव्याने विकसित केल्या आहेत.




मानवी हालचाली अचूकपणे ओळखून अतिनील किरणांचे उत्सर्जन थांबवण्यासाठी यात 'पीआयआर' सेन्सर वापरला आहे. रूममध्ये फिरताना अडथळ्यांवर थडकून तो खराब होऊ नये यासाठी अँटीकोलायजन सेन्सर बसविला आहे. निर्जंतुकीकरणाच्या ठिकाणाचे मोजमाप घेण्यासाठी लॅडर सेन्सर आहे. त्यामुळे रोबोट ३६० अंश स्कॅनरच्या साहाय्याने मोजमाप घेऊन त्यानुसार निर्जंतुकीकरणासाठी लागणारी वेळ स्वतःच निश्चित करतो.

२० किलोग्रॅम वजन असणाऱ्या रोबोटची १० बाय १० मापाची खोली पाच मिनिटांपेक्षा कमी वेळेत निर्जंतुक करण्याची क्षमता आहे. यात वापरलेल्या ११ व्हॅटच्या १८ यूव्ही-सी ट्यूबमुळे कोरोना विषाणूसोबत इतर विषाणू व जीवाणूंचाही नायनाट करणे शक्य होणार आहे.

कोव्हिड १९ वॉर्ड, हॉल, रुग्णवाहिका, हॉटेल्स, उपाहारगृहे, सार्वजनिक वाहने, खासगी हॉटेल्स, विमानतळ व प्रवासी कक्ष, रेल्वे, घर, कार्यालये, व्यायामशाळा, महाविद्यालये, कारखाने, सिनेमागृह, बँक याठिकाणी निर्जंतुकीकरणासाठी रोबोट उपयोगी ठरणार आहे.

रोबोटचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे हा आपल्यासोबत बोलू शकतो. कोरोना व इतर विषाणू, सूक्ष्म जीव, विकिरणे, विद्युतचुंबकीय लहरी, अतिनील किरणे अशा अनेक वैज्ञानिक बाबींवर माहिती देऊ शकतो. रोबोटसाठी बनवलेल्या खास अँड्रॉइड ॲपच्या मदतीने कुठूनही त्याला चालविणे शक्य आहे. मोबाईल वायफायद्वारे काही मीटर अंतरावरून देखील हाताळला जाऊ शकतो. इंटरनेट ऑफ थिंग्स (आयओटी) तंत्रज्ञानाद्वारे परदेशातून रोबोट चालवता येणे शक्य आहे.

“



यू. व्ही. मोड्युल ३६० (तारा) रोबोटच्या १, २, ३ व ४ अशा आवृत्ती काढण्यासाठी प्रयत्न करत आहे. रोबोट रुग्णांशी संवाद देखील साधू शकणार असल्याने रुग्णालयातील डॉक्टरांना याचा फायदा होणार आहे. यापूर्वी मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या मदतीने अत्याधुनिक व कमी खर्चात 'सॅनिटायझर टनेल', अतिनील किरणांचा वापर करून यू. व्ही. टॉर्च : एक संरक्षक कवच याची निर्मिती केली आहे.

**- प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे,**
संशोधक, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
11 MAY 2021
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# १४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने आजपर्यंत विविध ९४ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या वतीने २२ मार्चपासून परीक्षा सुरू आहेत. परीक्षा होईल तसे निकालही वेळेत घोषित केले जात आहेत. सोमवारी ११ परीक्षांचे निकाल लागले. यात बी.ए.मल्टिमीडिया सत्र ३, ५ व ६, एम.बी.ए. - नियमित सत्र १ व २, बी.व्होक. - रिटेल मॅनेजमेंट अँड आयटी सत्र ५, अॅप्लाईड केमेस्ट्री सत्र ५ यांचा समावेश आहे.

विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० च्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने सुरू आहेत. सोमवारी ११ हजार १८५ पैकी १० हजार ६०९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली.

यात एमए., एम.लिब., एम.कॉम., मास्टर ऑफ व्हॅल्युशन, एमसीए, एम.एस्सी. - नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एम.ए., एम.एस्सी. (भूगोल), बीए., बी.एस्सी., एम.एस्सी. आदी अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या, अशी माहिती परीक्षा विभागाच्या वतीने देण्यात आली.

11 MAY 2021 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पारंपरिक पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्राच्या ऑनलाईन परीक्षा २५ मे पासून

## विद्यापीठाकडून तारखा जाहीर; ५७ अभ्यासक्रमांचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वर्षातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० हिवाळी सत्रातील सर्व पारंपरिक पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रथम सत्राच्या परीक्षा २५ मे पासून ऑनलाईन पद्धतीने सुरू होणार आहेत. ५७ अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातून ६ हजार ५०० हून अधिक विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत.

विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने वर्ष २०२०-२१ वर्षातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० हिवाळी सत्रातील परीक्षांना प्रारंभ झाला आहे. मात्र पारंपरिक पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रथम वर्ष, प्रथम सत्राचे प्रवेश उशिरा



शिवाजी विद्यापीठातून...

झाल्याने अद्याप परीक्षांच्या तारखा जाहीर केलेल्या नव्हत्या. दरम्यान, सोमवारी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार एक तासाचा परीक्षा कालावधी असणार आहे. २५ बहुपर्यायी स्वरूपाची ऑनलाईन परीक्षा असणार आहे.

२५ मे पासून एम. ए. सत्र-१ (सीबीसीएस - विविध विषय), एम.एम. मास कम्युनिकेशन, एम.ए. - योगा, बीजेसी सत्र-१ (रेग्युलर, क्रेडिट), एम.एम.- जैनालॉजी (फक्त दूरशिक्षण केंद्र विद्यार्थांसाठी), बी. लिब., एम.लिब सत्र-१, एम.एस.डब्ल्यू. सत्र-१, बी.एस्सी., एम.कॉम., एम.एस्सी.- सत्र-१, वाय. सी.एस.आर.डी. - एमआरएस., एमबीए, एम.टेक सत्र-१ परीक्षांचा समावेश आहे. परीक्षांचे निकाल विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार जाहीर केली जातील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

सकाळ

# विद्यापीठातील बहुपयोगी कॉमन फॅसिलिटी सेंटर

## संशोधकांबरोबर, उद्योगांनाही उपयुक्त; विज्ञान, तंत्रज्ञान मंत्रालयाकडून ११ कोटी निधी

**» तंत्रज्ञान दिवस विशेष**



**“शिवाजी विद्यापीठातील फॅसिलिटी सेंटर विविध वैज्ञानिक उपकरणांनी सुसज्ज आहे. याचा लाभ विद्यापीठातील संशोधकांना विविध चाचण्या घेण्यासाठी होतोच, मात्र विविध प्रकारच्या औद्योगिक चाचण्या घेण्यासाठी ही उपकरणे उपयोगात येतात.**

**- प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे,** अधिविभागप्रमुख, फॅसिलिटी सेंटर

**कोल्हापूर, ता. १० :** शिवाजी विद्यापीठात कॉमन फॅसिलिटी सेंटर असून, या अंतर्गत सॉफिस्टिकेटेड इन्स्ट्रुमेंटल ॲनॅलिटीकल फॅसिलिटी सुरू आहे. केंद्र सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडून सुमारे ११ कोटींचा निधी या अधिविभागाला मिळाला. या निधीच्या माध्यमातून विविध उपकरणे, यंत्रे घेतली आहेत. यामुळे विविध चाचण्या घेता येतात. विद्यापीठातील संशोधनाबरोबरच औषध निर्मिती, फौंड्री, सिमेंट, रसायन या उद्योगांसाठीही फॅसिलिटी सेंटर उपयोगी पडते.

- ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोपी- या मायक्रोस्कोपची किंमत सुमारे पाच कोटी तीन लाख आहे. यात १० नॅनोमीटरपेक्षाही सूक्ष्म आकाराचा घटक स्कॅन करता येतो. याचा उपयोग फौंड्री उद्योगातील काही चाचण्या घेण्यासाठी होतो.
- ग्लास ब्लोइंग मशिन- प्रयोगशाळेतील किंवा कारखान्यात लागणाऱ्या काचेच्या वस्तू या यंत्राद्वारे बनविल्या जातात. विविध प्रकारच्या उद्योगांना याचा उपयोग होतो.
- गॅस क्रोमॅटोग्राफी मास स्पेक्टोस्कोपी- याचा उपयोग प्रामुख्याने औषध निर्मिती उद्योगात केला जातो. औषधातील अशुद्धता दूर करण्यासाठीही हे उपकरण उपयोगी पडते. तसेच, वायूंमधील घटकांच्या विलगीकरणासाठीही उपयोगात आणले जाते.
- इंडक्टीव्हली कपल्ड प्लाझ्मा ऑप्टिकल स्पेक्टोस्कोपी : कोणत्याही धातूतील अपायकारक घटक शोधण्यासाठी याचा उपयोग होतो. फौंड्री उद्योगातही याचा उपयोग होतो.
- एक्सरे डिफरॅक्शन मशिन- स्फटिक रचना शोधणे, त्यातील शुद्धता तपासणे, स्फटिकांमधील घटकांचे विश्लेषण करणे या गोष्टी या मशिनच्या माध्यमातून केल्या जातात. सिमेंट निर्मिती, फौंड्रीमधील विविध चाचण्यांसाठीही याचा उपयोग होतो.
- बायो ए.एफ.एम. (ॲटोमिक फोर्स मायक्रोस्कोपी)- सरफेस प्रोफाईलचा अभ्यास करण्यासाठी याचा उपयोग होतो. या माध्यमातून युनिफाइड कोटिंग प्रोफाईल बनवण्यात येते.
- मायक्रो रमण- प्रख्यात वैज्ञानिक सी. व्ही. रमण यांचे नाव या उपकरणाला दिले आहे. यातून डायपल मूव्हमेंट अभ्यासता येते. औषधनिर्मिती उद्योगात याचा वापर होतो.
- एक्स.पी.एस. (एक्स रे फोटो इलेक्ट्रॉन स्पेक्ट्रॉस्कोपी)- हे उपकरण राष्ट्रीय उच्चतर शैक्षणिक अभियानांतर्गत (रुसा) घेतले आहे. विविध प्रकारच्या केमिकल बौंडिंग ॲनॅलिसिससाठी याचा उपयोग केला जातो.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या ९४ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठअंतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या ३२४ ऑनलाईन परीक्षांपैकी ९४ परीक्षांचे निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केले आहेत. १५ टक्के कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत वेळेत निकाल जाहीर करणे आव्हानात्मक होते. परंतू परीक्षा विभागातील कर्मचाऱ्यांनी वर्क फ्रॉम होम असूनही निकाल जाहीर केले आहेत. शिवाजी विद्यापीठअंतर्गत बी. ए. मल्टिमीडिया सेमिस्टर तीन, चार, पाच आणि सहा, एम. बी. ए. रेग्युलर सेमिस्टर एक व दोन, बी, व्होक, अप्लाईड केमेस्ट्री आदी विषयांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यार्थ्यांना आपले निकाल विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. ज्या विषयांच्या परीक्षा पूर्ण झाल्या आहेत, त्या परीक्षांचे निकाल पूर्ण करण्याचे काम युद्धपातळीवर सुरु आहे.

तरुण भारत


# पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन परीक्षा २५ मे पासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी. अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया उशिरा झाली होती. त्यामुळे पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नियमित व रिपीटरच्या ऑनलाईन परीक्षा २५ मेपासून सुरू होणार आहेत. या परीक्षांसंदर्भातील माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी परिपत्रकाव्दारे प्रसिध्द केली आहे. ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या पारंपारिक अभ्यासक्रम एम. ए., एम. कॉम., एम. एस्सीच्या परीक्षा २५ मे पासून सुरू होणार आहेत. या परीक्षेसाठी १ तासाचा कालावधी असून, ५० गुणांसाठी २५ बहुपर्यायी प्रश्न आहेत. राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करीत या परीक्षा होणार आहेत. यामध्ये अर्थशास्त्र, रसायनशास्त्र, मानसशास्त्र, गृहशास्त्र, इतिहास, मराठी, इंग्रजी, हिंदी, रशियन लँग्वेज, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र यासह अन्य विषयांचा समावेश आहे.

तरूण भारत

# झेप अॅकॅडमीच्या वेबिनारला प्रतिसाद

गडहिंग्लज : झेप अॅकॅडमीच्या वतीने 'वेळेचे व्यवस्थापन" या विषयावर आयोजित केलेल्या मोफत ऑनलाईन वेबिनारला चांगला प्रतिसाद मिळाला. झेप अॅकॅडमीचे ९० प्रशिक्षणार्थीसह रवळनाथ सोसायटी, ज्ञानदीप परिवार यात सहभागी झाला होता. ऑस्ट्रेलियातून शिवानंद मरगुद्री हे सहभागी झाले होते.




शिवाजी विद्यापीठाचे विस्तार विभागाचे संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी मार्गदर्शन करताना, वेळ ही सर्वात मौल्यवान गोष्ट आहे. एकदा गेलेली वेळ पुन्हा येत नाही. सकारात्मक विचार व कौशल्य त्याचबरोबर वेळेचे योग्य व्यवस्थापन केल्यास कोणत्याही क्षेत्रात नक्की यश मिळते. जीवनातील सुख सोयीमुळे वेळेचे महत्व दुर्लक्षीत झाले आहे. वेळ ही कायमस्वरूपी गुंतवणुक असून भांडवलाप्रमाणे त्याचा योग्य उपयोग केला पाहिजे. दैनंदिन कामाचे प्राधान्यक्रम निश्चित करून त्याची पुर्तता वेळेवर केली तरच आपला भविष्यकाळ उज्ज्वल असल्याचे शेवटी सांगितले. ज्ञानदीपचे अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक केले. झेपच्या प्राचार्या मिना रिंगणे यांनी स्वागत केले. तर सागर माने यांनी आभार मानले. डॉ. दत्ता पाटील, प्रा. विजय आरबोळे, कल्पना पाटील यांच्यासह अन्य उपस्थित होते.